Jain Irrigation Systems Ltd.
Small Ideas. Big Revolutions.

# गुणवत्ता, पर्यावरण, व्यवसायविषयक आरोग्य व सुरक्षा धोरण

## जैन प्लास्टिक पार्क

आम्ही जैन प्लास्टिक पार्क येथे योग्य गुणवत्ता, पर्यावरण, व्यवसायविषयक आरोग्य व सुरक्षा व्यवस्थापन प्रणालीद्वारे ग्राहकांचे संपूर्ण समाधान, उत्पादनांमध्ये उत्कृष्ट गुणवत्ता, बाजार पेठेत अग्रगण्यता, पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा तसेच आमच्या आवारातील सर्व सहकाऱ्यांच्या व इतर व्यक्तिंच्या व्यवसायविषयक आरोग्य व सुरक्षेसाठी प्रतिबद्ध आहोत.

**आम्ही आमची बांधिलकी खालील बाबींमधून निश्चित करू :**

१. दर्जेदार उत्पादनांची निर्मिती आणि स्पर्धात्मक व वाजवी किंमतीत वेळापत्रकाप्रमाणे उत्पादनाचा पुरवठा, प्रतिष्ठापण व सेवा.

२. पाणी व लाकूड यांच्यासारख्या नैसर्गिक साधन-संपत्तीच्या जतनासाठी प्लास्टिक पाईप व सूक्ष्मसिंचन पद्धतीच्या पुरस्काराद्धारे जलव्यवस्थापन आणि वनसंपत्तीच्या जतनासाठी बांधकाम, जाहिरात व इतर उद्योगात प्लास्टिक शीटचा वापर

३. सूक्ष्मसिंचन व तंतोतंत शेती पद्धतीच्या व उत्पादनांच्या पुरस्कारांद्वारे साधनांचा योग्य वापर करून शेती मालाच्या उत्पादकतेत व गुणवत्तेत वाढ.

४. उत्पादन प्रक्रियेतील अस्वीकृत टाकावू पदार्थाची निर्मिती कमीत कमी ठेऊन, ऊर्जा व पाणी यासारख्या संसाधनांचा पुनर्निमाणक्षम उपयोग, कच्चा माल व इतर साधनसामुग्रीचा योग्य वापर करून व ध्वनीप्रदूषण व धुळीचं प्रमाण कमी करून, संगठनेशी संबंधित असलेल्या प्रदूषणास प्रतिबंध व अन्य विशिष्ट जबाबदाऱ्यांचे पालन करून पर्यावरणाचे संरक्षण.

५. इजा अथवा आजारास प्रतिबंध करण्यासाठी जोखीम मूल्यमापन, उचित प्रक्रिया, कृती व घटना तपास व विश्लेषण प्रणाली.

६. सर्व संबंधितांमध्ये गुणवत्ता, पर्यावरण संरक्षण आरोग्य व सुरक्षा याबाबत जागृतीसाठी प्रशिक्षण, दर्शके व इतर संपर्क साधनांचा वापर व कामगीरी मूल्यांकनाद्धारे सहभागाची प्राप्ती.

७. गुणवत्ता, पर्यावरण, व्यवसायविषयक आरोग्य व सुरक्षा याकरिता लागू असलेल्या गुणवत्ता, पर्यावरण घटक व व्यवसायविषयक आरोग्य व सुरक्षा घातकासबंधित प्रचलित वैधानिक व इतर गरजांच्या पालनाची पूर्तता.

८. आर्थिक दृष्ट्या टिकाऊ तंत्रज्ञानाचा स्वीकार, उद्दिष्ट व ध्येयांची निश्चिती व समीक्षा आणि सर्व सहकाऱ्यांच्या सक्रिय सहभागाने गुणवत्ता, पर्यावरण, व्यवसायिक आरोग्य व सुरक्षा यामध्ये सतत सुधार.

हे धोरण आमच्या कंपनीसाठी, कंपनीच्यावतीने अथवा नियंत्रणात काम करणाऱ्या सर्व व्यक्तिंना त्यांच्या वैयक्तिक कर्तव्याप्रति जाणिव असण्याबाबत कळविण्यात आलेले आहे तसेच मागणीनुसार सर्व संबंधितांना उपलब्ध करून दिले जाईल.

दिनांक : ०१ एप्रिल २०१६

तंत्र संचालक

टिप : हे धोरण भारतातील सर्व जेआयएसएल ॲग्री. इनपुट व प्लास्टिक उत्पादन प्रकल्पांना लागू आहे. उदा. जळगाव, हैद्राबाद, उदुमलपेठ, भावनगर, अलवर इत्यादि.

**Regd. Off.:** Jain Plastic Park, P.O.Box: 72, N.H. No. 6, Jalgaon - 425 001. India.
Tel: +91-257-2258011; Fax: +91-257-2258111;
E-mail: jisl@jains.com; Visit us at: www.jains.com
CIN: L29120MH1986PLC042028

Live & Let Live
Lord Mahaveer